**SNBP's INTERNATIONAL SCHOOL, MANJRI.**

**Subject: MARATHI - Class: VII Dated: 29-04-2020**

( अपठित उतारा )

प्र. १.खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा:

केवळ धडाडी दाखवून सर्व कामं होतात असं नाही. प्रश्नाच्या मुळाशी जाऊन कल्पकतेने मार्ग काढले तर अनेक प्रश्न मुळातून सुटतात, याचं भान किरण बेदींना आहे. 1980 मध्ये पश्चिम दिल्लीच्या जिल्हा पोलीस आयुक्तपदाची सूत्रं त्यांच्याकडे आली. हा भाग त्या काळी गुंडांचा, दरोडेखोरांचा प्रदेश म्हणून ओळखला जायचा. इथल्या गुंडांना त्यांनी वठणीवर आणलं. या विभागात काही जण दारू गाळण्याचा धंदा करायचे, ज्यावेळेस किरण बेदी या प्रश्नाच्या मुळाशी गेल्या तेव्हा त्यांना जाणवलं की, हे सर्व लोक बेरोजगार आहेत, म्हणून हा धंदा करताहेत. त्यावेळी त्यांनी या लोकांना बँकांचं कर्ज मिळवून दिलं. जागा मिळवून दिली. त्यामुळे या माणसांनी आपला व्यवसाय बदलून टाकला. त्याकाळी हा एक चमत्कारच मानला गेला.

किरण बेदींचं नाव भारतभर पसरायला आणि भारताबाहेरही जायला त्यांची एक कामगिरी खूप महत्त्वाची ठरली, ती म्हणजे तिहार जेलचा त्यांनी केलेला कायापालट. तिहार तुरुंगाची क्षमता आहे दोन हजार कैद्यांची. परंतु प्रत्यक्षात तिथे आठ ते दहा हजार कैद्यांना ठेवलं जातं, एखाद्या कैद्याला तुरुंगात ठेवण्याचा हेतू हा असतो की, तिथून बाहेर पडून तो समाजात पुन्हा नीट मिसळू शकेल. पण हा हेतू सफल होणं जवळपास अशक्यच होतं. मात्र हे काम किरण बेदींनी करुन दाखवलं.

प्रश्न–खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

(i) (अ) केवळ ________ दाखवून सर्व कामं होतात असं नाही.
(धैर्य, धडाडी, कर्तबगारी)

(ब) तिहार तुरुंगाची क्षमता किती कैद्यांची आहे ?
(तीन हजार, दोन हजार, पाच हजार)

(ii) 1980 साली किरण बेदी कोणत्या पदावर होत्या ?

(iii) वरील उताऱ्यास योग्य शीर्षक द्या.

**किंवा**

हे सर्व लोक बेरोजगार आहेत.
(अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

(iv) किरण बेदींनी गुंडांचा कोणता चमत्कार घडवून आणला ?

प्र २.काळाचे मुख्य प्रकार किती आहेत ? त्यांची नावे लिहा.

प्र ३.खालील वाक्यातील काळ ओळखा.

१.सूर्य पूर्वेला उगवतो.

२.मला लाडू आवडला.

३.आईचा स्वयंपाक झाला होता.

४.मी गावात जाईल.

५.मी पोहायला शिकत आहे.

६.समर वेगाने धावतो.

प्र.४. खालील शब्दाचे लिंग बदला.

१. चिमणी

२.नाग

३.वाघ

४.सिंह

५.गाढव

६.मोर

प्र.५. विरुद्ध अर्थी शब्द लिहा.

१.हित

२.अवघड

३.निकृष्ट

४.कीर्ती

५.श्रीमंत

६.फायदा

प्र.६.समानार्थी शब्द लिहा.

१.सण

२.आरास

३.नातेवाईक

४.सजावट

५.गाणे

६.कान

प्र.७. वचन बदला.

१. चांदण्या

२.गाडी

३.घंटा

४.दिवा

५.रोप

६.हाक

प्र.८. मराठी महिन्यांची नावे लिहा.

प्र.९. खालील पैकी एका विषयावर १० /१५ ओळी निबंध लिहा.

१. माझा प्रिय खेळ

२.छत्रपति शिवाजी महाराज .

प्र.१०. शब्द कोडे .

खालिल दिलेल्या चौकटीत मराठी महीन्यांची नावे लपलेली आहेत ती शोधून शब्द कोडे पुर्ण करा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| भा | क्ष | श्रा | झ | मा | घ | चै |
| ढ | द्र | थ | व | ल | ध | त्र |
| का | य | प | भ | ण | ब | क्ष |
| र्ति | पौ | च | द | त्र | मा | वै |
| क | ष | आ | श्वि | न | र्ग | शा |
| ग | प | त्र | षा | ळ | शी | ख |
| ढ | व | झ | ह | ढ | र्ष | ड |

प्र.११. खालील चित्र पाहुन १५ वाक्य लिहा.



________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________